महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पुणे, शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६

# बक्षिसाची रक्कम विद्यार्थ्याने दिली अनाथ मुलींच्या स्पर्धांसाठी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कात्रज :** खासदार क्रीडा महोत्सव पुणे २०२५ अंतर्गत आयोजित वुशू स्पर्धेत सिटी इंटरनॅशनल स्कूल, इयत्ता सहावीचा विद्यार्थी संकर्षण आनंद अडसूळ याने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल त्याला सुवर्णपदक तसेच रोख निधी प्रदान करण्यात आला. मात्र, संकर्षणने केवळ क्रीडा क्षेत्रातच नव्हे, तर माणुसकीच्या क्षेत्रातही मोठेपण दाखवले आहे. स्पर्धेत मिळालेला संपूर्ण निधी त्याने व्हिक्टोरिया स्पोर्ट्स क्लबमार्फत अनाथ मुलींच्या पुढील क्रीडा स्पर्धांसाठी देण्याचा निर्णय घेतला.



**संकर्षण अडसूळ**

आजच्या स्पर्धात्मक युगात वैयक्तिक यशालाच प्राधान्य दिले जाते, अशा काळात संकर्षणसारख्या विद्यार्थ्याने सामाजिक जाणीव ठेवून घेतलेला हा निर्णय सर्वांसाठी आदर्श ठरणारा आहे. खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास आणि जिंकण्याची उमेद मिळतेच; पण त्यासोबतच माणुसकी, सहवेदना आणि समाजभानही घडते, याचे उत्तम उदाहरण संकर्षणने घालून दिले आहे.

संकर्षणच्या या यशाबद्दल त्याचे पालक, शिक्षक, सिटी इंटरनॅशनल स्कूल तसेच व्हिक्टोरिया स्पोर्ट्स क्लब यांनी त्याचे अभिनंदन केले. त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यात तो केवळ उत्तम खेळाडूच नव्हे, तर समाजासाठी कार्य करणारा आदर्श नागरिक बनेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.